दिनांक- ०४/१२/२०१८.

**विषय – भाडेतत्वावर वाहने पुरविणे (२०१९-२१) ई टेंडर करिता आयोजित प्रीबीड मिटींगचे इतिवृत्त.**

भाडेतत्वावर वाहने पुरवठासाठी (२०१९-२१) ई टेंडर करिता Pre Bid meeting दि .०४/१२/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती. बैठकीसाठी खालील पुरवठादार उपस्थित होते.

१. मे. एटिन ट्रॅव्हल्स, पुणे.
२. मे. जोगेश्वरी ट्रॅव्हल्स, पुणे.
३. मे. मागोवा एन्टरप्रायजेस, पुणे.

तसेच यशदा तर्फे खालील अधिकारी उपस्थित होते.

१. सदाशिव पाटील, निबंधक तथा वित्तीय सल्लागार.
२. देवराम शेळके, लेखाधिकारी तथा प्रमुख प्रापण कक्ष.
३. अजय दिवटे, सहायक वाहतूक संकलन.
४. विकास कटकधोंड, सहायक प्रापण.

बैठकीमध्ये खालील मुद्दयांवर चर्चा होऊन पुरवठादारांचे शंका निरसन करण्यात आले.

| क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्दयाबाबतचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | अट क्र. १० ठेकेदारास कार्यालयाकडून वाहनाची वर्दी (बसेस साठी किमान ०२ दिवस आधी व इतर वाहनांसाठी किमान ०२ तास अगोदर) देण्यात येईल.<br>याबाबत इतर वाहनांसाठी ०२ तासाऐवजी किमान ०४ तास करणेबाबतचा मुद्दा मे. मागोवा एन्टरप्रायजेस यांनी उपस्थित केला. | सदर अटीमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. |
| २. | अट क्र. १२ ठेकेदाराकडून पुरविण्यात येणारे वाहन मागणी केलेल्या प्रकाराचे व सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच त्याची देखभाल योग्य प्रकारे केलेली असावी. पुरविलेले वाहन एक लाख कि मी पेक्षा कमी धाव झालेले असले पाहिजे.<br>याबाबत मे. एटीन ट्रॅव्हल्स यांनी एक लाख धाव ऐवजी ३ वर्षाचे वाहन असावे असा मुद्दा उपस्थित केला. | सदर अटीमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. |
| ३. | अट क्र. १५ प्रवासादरम्यान अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.<br>यावर जबाबदारी घेण्याबाबतचा मुद्दा मे. मागोवा एन्टरप्रायजेस यांनी उपस्थित केला होता. | सदर अटीमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४. | अट क्र. २५ वाहनाची वर्दी दिल्यानंतर वर्दीच्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर वर्दी रद्द करण्याची सूचना केल्यानंतर सदर वाहनाची वर्दी रद्द समजण्यात यावी आणि ज्या प्रकारच्या वाहनाची मागणी केली आहे त्याच प्रकारचे वाहन पुरविणे बंधनकारक राहील.<br>याबाबत वेळेची मुदत वाढवून देणेबाबत मे. मागोवा एन्टरप्रायजेस यांनी मुद्दा उपस्थित केला होता. | सदर अटीमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. |
| ५. | अट क्र. २७ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/ प्र. क्र. ८२/ भाग-III/ उद्योग-४ दिनांक- ०१ डिसेंबर, २०१६, ६.८ मधील परिशिष्ट - ८ नुसार शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांना तसेच सुक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सुट देण्यात यावी. यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/ महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील.<br>याबाबत मे. एटीन ट्रॅव्हल्स यांनी कोणत्याही साहित्याचा पुरवठा करत नसून सर्व्हिस देणार असल्याने प्राधिकार पत्र देता येणार नाही असा मुद्दा उपस्थित केला. | याबाबत अट क्र. २६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे सांगण्यात आले. |
| ६. | परीशिष्ट 'अ' अ. क्र. १० नुसार ४९ Seater AC/Non-AC वाहन उपलब्ध होत नाही. तसेच आर टी ओ कार्यालयाने ४९ सिट वाहनाचे पासिंग बंद केले असल्याने ४५ सिट वाहन उपलब्ध करण्याबाबत विनंती केली.<br>याबाबत मे. जोगेश्वरी ट्रॅव्हल्स यांनी मुद्दा उपस्थित केला. | याबाबत अनु. क्र. ९ व १० मध्ये ४९ सिट ए.सी. व ४९ सिट नॉन ए.सी. ऐवजी ४५ Seater AC/Non-AC असा बदल करण्यात येत आहे. |
| ७. | परीशिष्ट 'अ' अ. क्र. ११ नुसार Volvo Bus AC वाहन यामध्ये ३९ सिट, ४५ सिट व ५३ सिट असे वेगवेगळे प्रकार असल्यामुळे एकाच प्रकाचे दर मागवण्याबाबत मे. जोगेश्वरी ट्रॅव्हल्स यांनी मुद्दा उपस्थित केला. | याबाबत अनु क्र. ११ मध्ये Volvo Bus AC ऐवजी Volvo Bus AC (४४ Seater) असा बदल करण्यात येत आहे. |

**सदाशिव पाटील**
निबंधक तथा वित्तीय सल्लागार

**देवराम शेळके**
लेखाधिकारी तथा प्रापण प्रमुख

**विकास कटकधोंड**
सहायक, प्रापण

**अजय दिवटे**
सहायक, वाहतूक संकलन